प्रातःकाल
www.pratahkal.com

# संपादकीय

## उत्तर प्रदेशची बूथ लढाई

देशाच्या राजकारणात असे म्हटले जाते की दिल्लीच्या सत्तेचा रस्ता उत्तर प्रदेशातून जातो. हे विधान लोकसभा निवडणुकीइतकेच उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीलाही लागू होते. उत्तर प्रदेशात निवडणुकीचा बिगुल अजून वाजलेला नाही; पण बूथवरची लढाई सुरू झाली आहे. २०२७ साठी भाजपने मोठ्या सभांआधी मतदार याद्या, पन्ना प्रमुख, कार्यकर्ते आणि कमकुवत बूथ यांचा हिशेब मांडायला सुरुवात केली आहे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याची ही रणनीती भाजपच्या निवडणूक व्यवस्थापनाची ताकद राहिली आहे. पण बूथ कितीही मजबूत असला, तरी मतदाराच्या मनात सरकारबद्दल नाराजी असेल तर संघटनेचे गणित पुरेसे ठरेल का? उत्तर प्रदेशची खरी लढाई याच प्रश्नाभोवती फिरणार आहे.

२०२७ च्या विधानसभा निवडणुकीला अद्याप वेळ असला, तरी भारतीय जनता पक्षाने आतापासूनच संघटनात्मक मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पक्षाचे नवे उत्तर प्रदेश प्रभारी विनोद तावडे ५ सप्टेंबरला पहिल्यांदा राज्याच्या दौऱ्यावर येत असून या भेटीपासून भाजप प्रत्यक्ष निवडणूक तयारीच्या दिशेने वेगाने पुढे जाणार असल्याचे संकेत आहेत. विशेष म्हणजे या तयारीच्या केंद्रस्थानी मोठ्या सभा, जाहिराती किंवा नेत्यांचे दौरे नसून मतदार यादी, बूथ समित्या, 'पन्ना प्रमुख', कार्यकर्त्यांची सक्रियता आणि कमकुवत बूथ यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. आधुनिक निवडणुकांचे युद्ध आता केवळ व्यासपीठावर नव्हे, तर मतदार यादीच्या प्रत्येक पानावर लढले जाते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

तावडे यांच्या पहिल्या दौऱ्यासाठी उत्तर प्रदेश भाजपने राज्य पातळीपासून विभाग आणि बूथपर्यंतची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे. विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत मतदार यादीतून कोणती नावे वगळली गेली, कोणती नवीन नावे समाविष्ट झाली, या काळात बूथवरील पक्ष कार्यकर्ते किती सक्रिय होते आणि कोणत्या भागात संघटनेला अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे, याचा तपशील तयार केला जात आहे. प्रत्येक बूथवरील पक्षाची टीम, पन्ना प्रमुखांची सक्रियता, मतदारांशी संपर्क आणि संघटनेचा विस्तार याचा अहवाल तयार होणार आहे. त्यातून कमकुवत बूथ शोधून ते मजबूत करण्याची रणनीती आखली जाणार आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की भाजप २०२७ ची निवडणूक राज्यव्यापी वातावरणावरच नव्हे, तर बूथनिहाय राजकीय गणितावर लढण्याची तयारी करीत आहे.

भाजपच्या निवडणूक यशामध्ये बूथ व्यवस्थापनाचे स्थान नेहमीच महत्त्वाचे राहिले आहे. निवडणूक प्रचारातील मोठ्या सभा वातावरण निर्माण करतात, नेत्यांची भाषणे समर्थकांमध्ये उत्साह निर्माण करतात आणि समाजमाध्यमांवरील प्रचार राजकीय संदेश दूरवर पोहोचवतो; मात्र या वातावरणाचे मतांमध्ये रूपांतर शेवटी बूथवरच होते. मतदाराच्या घरापर्यंत पोहोचणे, त्याचे नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासणे, मतदानाच्या दिवशी समर्थक मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचेल याची व्यवस्था करणे आणि स्थानिक नाराजी वेळेत पक्षापर्यंत पोहोचविणे या सगळ्या बाबी बूथ संघटनेवर अवलंबून असतात. म्हणूनच निवडणुकीच्या दीड वर्ष आधीपासून बूथची नाडी तपासणे हा भाजपचा राजकीय अनुभवातून आलेला निर्णय मानावा लागेल.

उत्तर प्रदेशचे महत्त्व केवळ ते देशातील सर्वाधिक लोकसंख्येचे राज्य आहे म्हणून नाही. राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरविण्याची क्षमता या राज्यात आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशातील सत्ता टिकविणे भाजपसाठी प्रतिष्ठेचे आहे. दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर कोणत्याही पक्षासमोर सत्ताविरोधी भावना, स्थानिक आमदारांविषयी नाराजी, अपूर्ण अपेक्षा आणि कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता अशा समस्या निर्माण होतात. केंद्र किंवा राज्यातील लोकप्रिय नेतृत्व प्रत्येक मतदारसंघातील स्थानिक प्रश्न कायम झाकून ठेवू शकत नाही. त्यामुळे पक्षाच्या राज्य नेतृत्वाने पाठविलेल्या अहवालांवर समाधान मानण्याऐवजी बूथपर्यंतची वास्तविक परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न आवश्यक ठरतो.

याच कारणामुळे विनोद तावडे यांचा पहिला दौरा औपचारिक भेटीपुरता मर्यादित राहणार नसल्याचे दिसते. ते राज्यातील पदाधिकारी आणि प्रमुख नेत्यांशी चर्चा करून संघटनेची स्थिती, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि निवडणूक तयारीचा आढावा घेणार आहेत. तयार होणाऱ्या बूथनिहाय अहवालाच्या आधारे संघटनेतील कमकुवत दुवे ओळखून आवश्यक बदल केले जाण्याची शक्यता आहे. प्रभारी म्हणून तावडे यांच्या रणनीतिक कौशल्याचीही ही एक प्रकारे परीक्षा असेल. उत्तर प्रदेशसारख्या विशाल, सामाजिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील राज्यातील निवडणूक कोणत्याही एका सूत्राने जिंकता येत नाही. प्रदेशनिहाय सामाजिक समीकरणे, उमेदवारांची प्रतिमा, स्थानिक प्रश्न आणि संघटनात्मक ताकद यांचा मेळ घालावा लागतो.

या तयारीत मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला दिले जाणारे महत्त्वही लक्षवेधी आहे. लोकशाहीमध्ये मतदार यादी ही निवडणुकीचा पाया असते. पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाणे किंवा अपात्र नाव यादीत राहणे या दोन्ही गोष्टी निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेशी संबंधित आहेत. राजकीय पक्षांनी मतदार यादी तपासणे स्वाभाविक आहे; पण ही प्रक्रिया पक्षीय स्पर्धेच्या पलीकडे पारदर्शक आणि विश्वासार्ह राहणे तितकेच आवश्यक आहे. निवडणूक आयोग आणि प्रशासनावर सर्व पात्र नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळेल याची जबाबदारी असते. राजकीय पक्षांनीही मतदार यादीतील बदलांकडे केवळ संभाव्य मतांच्या नफा-तोट्याच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी मतदाराच्या हक्काच्या दृष्टीने पाहायला हवे.

भाजपच्या या सूक्ष्म नियोजनातून विरोधी पक्षांनाही धडा घेण्यासारखा आहे. निवडणुकीच्या काही महिने आधी मोठ्या सभा घेऊन किंवा समाजमाध्यमांवर वातावरण निर्माण करून मजबूत संघटनेला पर्याय उभा राहत नाही. बूथवर कार्यकर्ता नसेल, स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांची नोंद नसेल आणि मतदाराशी सातत्यपूर्ण संपर्क नसेल तर राज्यस्तरीय लोकप्रियता मतदानाच्या दिवशी अपेक्षित निकाल देईलच असे नाही. उत्तर प्रदेशातील विरोधकांना भाजपशी प्रभावी मुकाबला करायचा असेल तर त्यांनाही संघटनात्मक पातळीवर तितकीच गंभीर तयारी करावी लागेल. सक्षम विरोधक आणि मजबूत सत्ताधारी पक्ष यांच्यातील स्पर्धाच लोकशाही अधिक उत्तरदायी बनवू शकते.


मात्र निवडणूक रणनीती कितीही सूक्ष्म असली तरी मतदाराला कायम संघटनात्मक गणिताचा घटक समजण्याची चूक कोणत्याही पक्षाने करू नये. बूथ मजबूत करण्यासाठी कार्यकर्ते नेमता येतात, मतदार यादीतील प्रत्येक पानासाठी प्रमुख नेमता येतो आणि मतदारांचे सामाजिक-भौगोलिक वर्गीकरण करता येते; पण बेरोजगारी, महागाई, शेती, शिक्षण, आरोग्य, कायदा-सुव्यवस्था आणि स्थानिक विकासाबद्दल मतदाराच्या मनात निर्माण झालेली भावना केवळ व्यवस्थापनाने बदलता येत नाही. निवडणुकीचे तंत्र मतदाराला मतदान केंद्रापर्यंत आणू शकते; त्याचे मत कोणाला द्यायचे हे शेवटी त्याचा अनुभव ठरवतो.

२०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीची खरी लढाई म्हणून दोन पातळ्यांवर होणार आहे. एकीकडे भाजपचे संघटनात्मक कौशल्य, बूथ व्यवस्थापन आणि मतदारांशी सूक्ष्म संपर्क असेल; दुसरीकडे सरकारच्या कामगिरीचा मतदार स्वतःच्या आयुष्याच्या अनुभवातून लावणारा हिशेब असेल. विनोद तावडे यांच्या ५ सप्टेंबरच्या दौऱ्याने पहिल्या लढाईची औपचारिक सुरुवात होईल. त्यांच्या रणनीतिक कौशल्याची ही कसोटी असेलच; पण अंतिम परीक्षा भाजपची असेल आणि निकाल मतदार देणार आहे.

कारण निवडणुका बूथवर जिंकल्या जात असल्या, तरी त्या आधी मतदाराच्या मनात जिंकाव्या लागतात. पन्ना प्रमुख मतदाराच्या दारापर्यंत पोहोचू शकतो; पण मत कोणाला द्यायचे, याचा निर्णय त्या दाराआडच्या अनुभवातूनच होतो. म्हणून बूथ जिंकण्याआधी मतदाराचे मन जिंकावे लागेल.

# सहस्त्रकातील कवयित्री: अमृता प्रीतम!

❒ प्रा. विजय कोष्टी, सहयोगी प्राध्यापक



'माझी कहाणी ही प्रत्येक देशातल्या स्त्रियांची कहाणी आहे आणि अशा आणखी कितीतरी कहाण्या आहेत, ज्या कधी कागदावर उतरल्या नाहीत; पण ज्या स्त्रियांच्या शरीरावर आणि मनांवर लिहिल्या गेल्या आहेत,' अमृता प्रीतम यांच्या 'काळा गुलाब' या आत्मचरित्रातील हे विधान त्यांची भूमिका तर व्यक्त करतेच. शिवाय त्यांची शब्दांतून व्यक्त होण्याची पद्धत, नाजूक संवेदना, व्याकूळ भावना, अस्वस्थता आणि आपल्या दुःखाचे वैश्विक परिमाण शोधण्याची वृत्ती या बाबीही अधोरेखित करते.

पंजाबी आणि हिंदी भाषेत विपुल लेखन करणाऱ्या, ज्यांच्या साहित्यात मुक्त व विचारी स्त्रीचा आवाज ऐकू येतो, ज्यांनी जीवनात तसेच लेखनात बंडखोरी केली व आलेले अनुभव अत्यंत प्रामाणिकपणे शब्दबद्ध केले, अशा सहस्त्रकातील कवयित्री अमृता प्रीतम यांचा जन्म पंजाब मधील गुजरांवाला या गावी ३१ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे सर्व बालपण लाहोर जवळच्या या गावीच गेले. कवितेचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले. त्यांचे वडील कर्तारसिंह 'पीयूष' या नावाने कविता लेखन करीत असत. 'बालका साधू' म्हणून विरक्त आयुष्य स्वीकारलेल्या वडिलांनी संस्कृत व ब्रज भाषेचे अध्ययन केले होते तर ब्रज भाषेत कविता लिहित होते. विरक्त वृत्तीचे असले तरी समाज मनाची जाण असलेले ते गृहस्थ होते. अमृता दहा -अकरा वर्षाच्या असताना त्यांच्या आईचे निधन झाले व त्या पोरक्या झाल्या. हळूहळू त्यांचे मन स्वप्नाळू बनत गेले. अनेक वर्षे त्या स्वप्नामध्येच जगत राहिल्या. घरात वडिलांशिवाय कुणी नव्हते. जगा पासून या अल्लड मुलीला वाचविण्यासाठी म्हणून तिची शेजाऱ्यांशी, मित्र-मैत्रिणींशी कोणाशीही ओळख नको या वडिलांच्या धारणेमुळे अमृताजींचे बालपण एका वेगळ्याच कोंडलेल्या स्थितीत गेले. आणि मग त्या एकटेपणात कविता करू लागल्या. तथापि, परंपरा वादी शीख घराण्यातील धार्मिक वृत्तीच्या वडिलांना त्यांनी केवळ धार्मिक कविताच कराव्यात असे वाटायचे. अशा प्रकारच्या अटी-निर्बंधामुळे निष्फळ प्रेमाच्या, दबलेल्या भावनांनी कल्पनेशी, स्वप्नांशी नाते जोडले आणि यातूनच त्यांच्या अनेक कवितांची निर्मिती झाली. १९३६ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी अमृत लहरे (अमर वेव्हज) हा कवितांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित केला.

लहानपणा पासूनच व्यस्त असलेल्या संपादक प्रीतम सिंगशी त्यांचे बालपणीच लग्न झाले आणि अमृत कौर यांचे नाव बदलून अमृता प्रीतम झाले.

अमृता-इमरोज यांचे ४० वर्षांचे सहजीवन, प्रेम,मैत्री,समाजाची त्या विरुद्धची प्र ख र प्रतिक्रिया,कुटुंबाच्या,मुलांच्या अपेक्षा, अमृताजींनी न लपविलेले त्यांचे साहीर लुधियानवी विषयीचे प्रेम या सगळ्यांची त्यांना मोजावी लागलेली किंमत आणि त्यातून केलेले आणि कितीही विरोध झाला तरी त्यांना आपोआप मिळत गेलेले सन्मान हे सर्वच विलक्षण आहे.

भारतीय ज्ञानपीठाचा १९८१ चा साहित्य पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यांचा काव्यसंग्रह 'कागज ते कैनव्हास' हा १९६५ ते १९७४ या कालावधीतील प्रकाशित भारतीय भाषेतील सृजनात्मक साहित्यातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती म्हणून घोषित करण्यात आला.

आशापूर्णादेवी नंतर ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणाऱ्या त्या दुसऱ्या लेखिका होत्या. 'अक्षरो का हुस्न, कागज की अमानत है' असे म्हणणाऱ्या, 'माझ्या सर्व रचना, कोणतीही कविता, कोणतीही कथा, कोणतीही कादंबरी, सर्व एका बेकायदेशीर मुलासारखे आहेत' अशी कबुली देणाऱ्या किंवा 'हर व्यक्ती की पीडा उसकी अपनी होती है, पर कई बार इन पीडाओं की आकृतियाँ मिल जाती है।' असे आपल्या साहत्यानिर्मितीचे एक कारण सांगणाऱ्या हिंदी-पंजाबी कवयित्री अमृता प्रीतम यांनी पंजाबी आणि तितकेच हिंदी वाङ्मयाला देखील आपल्या साहित्यकृतींनी सौंदर्य प्रदान केले आहे, सकस बनविले आहे.

त्यांच्या रचनांचा हा परिचय केवळ अमृता प्रीतम यांची विद्रोही वृत्तीच नव्हे तर साहित्यिक समाजाबद्दल असलेले त्यांचे दुः ख आणि वेदना देखील दर्शवितो.

त्यांची बंडखोर वृत्ती नेहमी अडचणीची ठरली. आपल्या मातृभाषेत, त्यांना इच्छित सन्मान मिळत नव्हता, परंतु अनुवादाच्या माध्यमातून त्या एकमेव लेखिका आहेत, ज्यांचे चाहते विदेशात पसरले होते. अमृता प्रीतम यांच्या अनेक कविता प्रेम जाणीवेने व्यापलेल्या होत्या. त्यांच्या प्रेम कवितांचा मूर्त चेहरा स्वतः अमृता प्रीतमच असून त्यांनी त्यांच्या जिवंत जे अनुभवले तेच कवितेतून मांडले. त्यांच्या प्रेमाचे वर्णन त्या 'सच्चे दुध जैसी मेरी मुहब्बत' असे एका वाक्यात करायच्या. त्यांनी 'मेरा शहर', 'मैं जनता', 'घोर काली घटा', 'राजनीती' यासारख्या सामाजिक कविता मधून राजकारणावर, व्यवस्थेवर प्रखर, आक्रमक, उपहासात्मक शब्दात भावना व्यक्त केल्या होत्या. अमृताजींचा साहित्यिक पिंड हा मूलतः कविव्यक्तिमत्त्वाचा असला तरी त्यांनी कादंबरी, कथा, ललित- गद्य आत्मचरित्र, डायरी, पत्रे, वैचारिक मूल्यांकनावर आधारित निबंध इत्यादी वाङ्मय प्रकार लीलया हाताळले असून त्यावर आपला एक वैशिष्ट्यपूर्ण असा अमीट ठसा उमटवला आहे. अमृता प्रीतम यांचे एकूण १६ काव्यसंग्रह आणि शंभर हून अधिक पुस्तके लिहिली आहेत.

यामध्ये चरित्र, कविता, पंजाबी लोकगीते याशिवाय इतर भाषांमधील आत्मचरित्रे यांचा समावेश असला तरी 'कविता' हे त्यांचे पहिले प्रेम होते. 'डॉक्टर देव', 'पिंजर', 'चक्करनंबर छत्ती', 'बुलावा', 'बंद दरवाजा', 'कोरे कागद', 'एरियल', 'सारा शगुफ्ता', 'एक थी अनिता', 'गाव नंबर ३६' या त्यांच्या काही कादंबऱ्या.

तर 'पाँच बरस लंबी सडक' हे कथापंचक, ज्यामध्ये त्यांनी स्त्री-पुरुषांच्या नात्या संबंधी व त्यांच्यातील संबंधांच्या कंगोऱ्याबद्दल लिहिले आहे. त्यांचे 'कडी धूप का सफर' हे पुस्तक जगभरातील स्त्री लेखिकांनी अनुभवलेल्या संघर्षात्मक जीवनाचे, समाजाकडून झालेल्या अडवणुकी चे चित्रण आहे. 'रसीदी टिकट' या त्यांच्या आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेत त्या लिहितात 'सहज बोलता बोलता खुशवंतसिंह मला म्हणाले 'तुझं आयुष्य तरी काय ग ? एखादी लहानशी घटना. बस लिहायचे म्हंटले तरी साध्या पावतीच्या तिकिटामागे लिहिले जाईल. मग कविता, कादंबऱ्या यांच्या कच्च्या जमाखर्चाची पावती पक्की करण्यासाठी त्यांनी 'रसीदी टिकट' हे आत्मचरित्र लिहिले. भारताबरोबर पाकिस्तानातही लोकप्रिय असणाऱ्या अमृता यांच्या 'पिंजर' या साहित्यकृतीवर चित्रपट निर्माण झाला होता.

अमृता यांची कविता चित्रासारखी सुंदर आहे. मग तीं वेदना व्यक्त करणारी असो की दिलासा देणारी ! ३१ ऑक्टोबर २००५ रोजी अमृता प्रीतम अनंतात विलीन झाल्या असल्या तरी आपल्या साहित्याच्या रूपाने त्या आजही आपल्यात आहेत. अमृता प्रीतम यांना भावपूर्ण आदरांजली !

## स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि.

वरदान कमशियल कॉम्पलेक्स वा मजला,
एम.आय.डी.सी. रोड नं. १६. बाग इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (प) ४००६०४
stemwatercompany@gmail.com

**E- Tender Notice No. 6 for 2026-27**

स्टेम वॉटर डिस्ट्रो ॲण्ड इन्फ्रा कं. प्रा. लि. ठाणे हे खालील कामासाठी ई-निविदा ब-१ व ड नमुन्यात मागविण्यात येत आहे.

| Sr. No | Name of Work | Date & Time |
|---|---|---|
| 1 | Annual Maintenance contract for maintenance & repairs to Civil Components & Electrical / Mechanical Machinery of Shahad Head works & 285 MLD WTP Temghar with allied components with supply of manpower services for 2 years. | Start Dt. 02/09/26 at 12.00 Hrs<br>Pre bid Dt. 08/09/26 at 12.00 Hrs<br>End Dt. 28/09/26 at 12.00 Hrs<br>Technical bid Open on Dt. 30/9/26 at 12.00 Hrs |

निविदा विषयक तपशिल स्टेम कंपनीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता येतील तसेच त्याच संकेत स्थळावरुन डाऊनलोड करून घेता येतील व सादर करता येतील. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व देकार फेटाळण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक

## बँक ऑफ महाराष्ट्र

बैंक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम

अंचल कार्यालय सुरतः दुसरा मजला, माइलस्टोन फिएस्टा,
मधुवन सर्कल जवळ, एल पी सवानी मार्ग, अदाजन, सुरत - ३९५ ००९.
टेलीफोन: ०२६१-२७३०५२०,
ई-मेल: cmfsmc_sur@bankofmaharashtra.bank.in.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीची नोटीस (परिशिष्ट - IV -ए)**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना नोटीस देण्यात येते की, बँक ऑफ महाराष्ट्रकडे गहाण/प्रभारित असलेली आणि बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेली खालील स्थावर मालमत्ता, बँक ऑफ महाराष्ट्रची कर्जदार आणि जामीनदारांकडून येणे असलेली थकीत रक्कम वसूल करण्यासाठी जसे आहे जेथे आहे*, "जसे आहे तसे आहे*, आणि जे काही आहे तेथे आहे* या तत्त्वावर **दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या** वेळेत विकली जाईल.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | जामीनदाराचे नाव | थकीत रक्कम | ताब्याचा प्रकार | राखीव किंमत / इसारा रक्कम (ईएमडी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | i) मे. प्रणिती पॅकेजिंग इंडस्ट्रीज एलएलपी, भागीदारांमार्फत, श्री. हेमांशू शांतीलाल वालिया (भागीदार) आणि सौ. प्रीती हेमांशू वालिया (भागीदार) | i) श्री. हेमांशू शांतीलाल वालिया<br>ii) सौ. प्रीती हेमांशू वालिया<br>iii) श्री. हेमांशू शांतीलाल वालिया (मे. अंबे पॅकेजिंग इंडस्ट्रीजचे प्रोप्रायटर) | कॅश क्रेडिट खाते क्र. ६०४३४२८६३५३: खात्यातील शिल्लक रु. ४,२४,४९,४८२.९३ + न लागलेले व्याज रु. ७,४८,१६१.२४ + त्यावर २४.०९.२०२४ पासून १०.८०% प्रतिवर्ष दराने व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याज.<br>मुदत कर्ज खाते क्र. ६०३४६३९८२०५: खात्यातील शिल्लक रु. २,०८,०४,५३२.४२ + न लागलेले व्याज रु. ८,०९,१४८.७५ + त्यावर २४.०९.२०२४ पासून १२.०५% प्रतिवर्ष दराने व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याज.<br>डब्ल्यूसीटीएल खाते क्र. ६०४३७१०५९८७: खात्यातील शिल्लक रु. ७६,००,०००.०० + न लागलेले व्याज रु. २,२२,२८०.५७ + त्यावर २४.०९.२०२४ पासून ९.२५% प्रतिवर्ष दराने व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याज.<br>जीईसीएल खाते क्र. ६०३६४७६०६८५: खात्यातील शिल्लक रु. ४,५५,९१९.६८ + न लागलेले व्याज रु. १०,३९७.३६ + त्यावर २४.०९.२०२४ पासून ९.२५% प्रतिवर्ष दराने व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याज. | प्रत्यक्ष | राखीव किंमत (आरपी): रु. २,७३,७७,०००/-<br>ईएमडी: रु. २७,३७,७००/-<br>बोली रक्कम: रु. ५,०००/- |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन:** २ बीएचके, फ्लॅट क्र. १०१, १ला मजला, क्षेत्रफळ १०३७ चौ. फूट, ५६वा रोड टी.पी.एस. III, एसएएमपी रेसिडेन्सी सी.एच.एस. लि., सीटीएस/सर्वे क्र. २१ सीटीएस ३१४, ३१४/१ ते ११, सर्वे क्र. २१ हिस्सा क्र. ४, गाव - बोरीवली, मुंबई, महाराष्ट्र येथील स्थावर मालमत्तेचा सर्व भाग आणि हिस्सा. चतुःसीमाः उत्तरेस - फ्लॅट क्र. १०४, राम मंदिर, पूर्वेस - माइलस्टोन बिल्डिंग, पश्चिमेस - फ्लॅट क्र. १०२, खुला भूखंड, दक्षिणेस - नाना पालकर स्मृती समिती.

**अटी आणि शर्ती:**
- प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि ज्ञानानुसार, मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचा बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे शीर्षक, बोजे आणि मालमत्तेवर परिणाम करणारे कोणतेही दावे/अधिकार/देणी याबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात बँकेची कोणतीही बांधिलकी किंवा प्रतिनिधित्व मानली जाणार नाही. मालमत्ता बँकेला ज्ञात असलेल्या किंवा नसलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विकली जात आहे. कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/अधिकारांसाठी/देण्यांसाठी प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.
- बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि वैशिष्ट्यांबद्दल स्वतःची पाहणी करून खात्री करून घेणे ही इच्छुक बोलीदाराची जबाबदारी असेल.
- यशस्वी बोलीदाराला प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम बोली स्वीकारल्यानंतर २४ तासांच्या आत, आधीच भरलेली इसारा रक्कम (ईएमडी) समायोजित करून, विक्री किंमतीच्या/अंतिम बोली रकमेच्या २५% रक्कम जमा करावी लागेल आणि उर्वरित ७५% रक्कम विक्री/लिलावाच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी, किंवा लेखी स्वरूपात मान्य केलेल्या वाढीव कालावधीत भरावी लागेल. यशस्वी बोलीदाराने सदर कालावधीत किंवा वाढीव कालावधीत ७५% रक्कम जमा न केल्यास, ईएमडी रकमेसह जमा केलेली २५% रक्कम जप्त केली जाईल आणि प्राधिकृत अधिकाऱ्याला तीच मालमत्ता पुन्हा लिलावात काढण्याची मुभा असेल.
- डेब्ट रिकव्हरी ट्रिब्युनल (डीआरटी), मुंबई येथे सिक्युरिटायझेशन अर्ज (एसए/२९१/२०२५) प्रलंबित आहे.
- लिलावातील खरेदीदार/यशस्वी बोलीदार लिलावाखालील निवासी मालमत्तेत असलेल्या आणि बँकेचा कोणताही प्रभार नसलेल्या कर्जदाराच्या वैयक्तिक वस्तूंवर कोणताही हक्क, मालकी किंवा हितसंबंध सांगू शकणार नाही.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया बँकेच्या वेबसाईटवर दिलेल्या https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search या लिंकला भेट द्या आणि तुम्ही बँकनेट पोर्टलवरून (https://baanknet.com/property-listing) मालमत्तेचे तपशील देखील मिळवू शकता. अधिक माहितीसाठी तुम्ही श्री. प्रवीण लाटकर, वरिष्ठ व्यवस्थापक-कायदेशीर यांच्याशी ०९७६७४७८७२५ या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

दिनांकः २९-०८-२०२६ ठिकाणः सुरत — प्राधिकृत अधिकारी

## बँक ऑफ बडोदा

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**नवी मुंबई प्रादेशिक कार्यालय:** ४०५, ४था मजला, प्लॅटिनम टेक्नो पार्क, कर्नाटक भवनसमोर, रघुलीला मॉलच्या मागे, वाशी - ४००७०२. **ई-मेल:** recovery.navimumbai@bankofbaroda.co.in

**परिशिष्ट IV-ए [नियम ८(६) आणि ६(२) ची तरतूद] - स्थावर आणि जंगम मालमत्तेच्या विक्रीची नोटीस**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि ६(२) च्या तरतुदींसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोंकडे गहाण/प्रभारित असलेली आणि बँक ऑफ बडोदा या सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, खाली नमूद केलेल्या खात्यांची/खात्याची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी जसे आहे जेथे आहे*, "जसे आहे तसे आहे*, आणि जे काही आहे तेथे आहे* या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/जामीनदार/सुरक्षित मालमत्ता/देणी/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम खालीलप्रमाणे नमूद केली आहे-

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदारांचे नाव आणि पत्ता | ज्ञात बोज्यांसह स्थावर मालमत्तेचे वर्णन, जर असल्यास | एकूण देणी | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | (१) राखीव किंमत आणि (२) ईएमडी रक्कम (३) बोली वाढीची रक्कम | मालमत्तेच्या ताब्याची स्थिती (सांकेतिक/प्रत्यक्ष) | मालमत्ता पाहणीची तारीख आणि वेळ / संपर्क व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. समर सत्यव्रत नायक** पत्ताः खोली क्र. ०६, स्पॅगेटी, डीएव्ही स्कूल जवळ, सेक्टर १५, खारघर, नवी मुंबई-४१०२१० | फ्लॅट क्र. १०३, १ला मजला, बी-विंग, साई रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १० आणि १२, गाव चिंचवली शेकीन, खोपोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड-४१०२०३ या मालमत्तेचा सर्व भाग आणि हिस्सा यांचे साम्यिक गहाण. बिल्ट अप क्षेत्रफळः ४१२ चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: माहिती नाही** | रु. २७,७१,०७८.३३/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. ७,२९,०००/- २. रु. ७२,९००/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्रीमती ज्योती कुमारी ८९७६०१६४००** |
| २ | **श्री. समर सत्यव्रत नायक** पत्ताः खोली क्र. ०६, स्पॅगेटी, डीएव्ही स्कूल जवळ, सेक्टर १५, खारघर, नवी मुंबई-४१०२१० | फ्लॅट क्र. १०४, १ला मजला, बी-विंग, साई रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १० आणि १२, गाव चिंचवली शेकीन, खोपोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड-४१०२०३ या मालमत्तेचा सर्व भाग आणि हिस्सा यांचे साम्यिक गहाण. बिल्ट अप क्षेत्रफळः ४१२ चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: माहिती नाही** | रु. २७,४६,०४३.६७/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. ७,२९,०००/- २. रु. ७२,९००/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्रीमती ज्योती कुमारी ८९७६०१६४००** |
| ३ | **श्रीमती रक्षा आनंद देवरे** पत्ताः ३०१, सद्गुरू कृपा बिल्डिंग, गोळवली ग्रामपंचायतीजवळ, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)-४२१२०२ | फ्लॅट क्र. २०१, क्षेत्रफळ ५५० चौ. फूट म्हणजेच ५१.११ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ, सुख शांती बिल्डिंगचा दुसरा मजला, जी एनए जमिनीवर बांधलेली आहे, स. क्र. ६९/१ए, प्लॉट क्र. २, सीटीएस क्र. ११४७, मौजे चिंचवली शेकीन, तालुका खालापूर, जिल्हा रायगड या मालमत्तेचा सर्व भाग आणि हिस्सा यांचे साम्यिक गहाण. बिल्ट अप क्षेत्रफळः ५५० चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: माहिती नाही** | रु. २९,९९,३१७.९९/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. ७,८९,३००/- २. रु. ७८,९३०/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. राकेश कुमार ८९७६८२६५५७** |
| ४ | **श्री. प्रकाश भीमराव पाटील** पत्ताः मुक्काम पोस्ट गाढब, तालुका पेण, रायगड-४०२१०७ | फ्लॅट क्र. ए२०१, २रा मजला, ए विंग, "एमविस टॉवर*, कारपेट क्षेत्रफळ ५८९ चौ. फूट, सर्वे क्र. १३१, ४७२, गाव पेण, जिल्हा रायगड-४०२१०७ येथे स्थित मालमत्तेचे साम्यिक गहाण. कारपेट क्षेत्रफळः ५८९ चौ. फूट आणि टेरेसः ८५ चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: माहिती नाही** | रु. ३२,९८,७९१.९३/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. २१,८९,७००/- २. रु. २,१८,९००/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. विशाल भड ८९७६८२६६०८** |
| ५ | **श्री. संदीप बाळू शिरवले सह-कर्जदार: श्रीमती जयश्री संदीप शिरवले** पत्ताः आशीर्वाद सोसायटी अंतोरा रोड, एस. टी. स्टँडच्या मागे, पेण, रायगड-४०२१०७ | फ्लॅट क्र. ३०२, ३रा मजला, राधाकृष्ण अपार्टमेंट, देवनगरी, पेण, जिल्हा रायगड-४०२१०७ या मालमत्तेचा सर्व भाग किंवा हिस्सा यांचे साम्यिक गहाण. बिल्ट अप क्षेत्रफळः ५०३.१२ चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: निरंक** | रु. ३३,९४,५५५.२३/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. १७,४६,०००/- २. रु. १,७४,६००/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. चंद्रशेखर ९६१८६४९३४५** |
| ६ | **श्रीमती प्रीती स्वप्नील सुर्वे** पत्ताः फ्लॅट क्र. ४०५, ४था मजला, आगरी समाज हॉलजवळ, चिंचपाडा रोड, गाव पेण, जिल्हा रायगड-४०२१०७ | फ्लॅट क्र. ४०५, ४था मजला, स. क्र. ६१ए, हिस्सा क्र. २/२, आगरी समाज हॉलजवळ, चिंचपाडा रोड, गाव पेण, जिल्हा रायगड-४०२१०७ या मालमत्तेचा सर्व भाग किंवा हिस्सा यांचे साम्यिक गहाण. बिल्ट अप क्षेत्रफळः ५५३ चौ. फूट. **बँकेला ज्ञात असलेले बोजे: निरंक** | रु. ३०,६६,७४१/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. २०,५७,४००/- २. रु. २,०५,७४०/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. चंद्रशेखर ९६१८६४९३४५** |
| ७ | **श्री. अनिकेत अनिल मोहिले सह-कर्जदार: श्रीमती स्वरादा सुहास परांजपे** पत्ताः २०६, सिलिकॉन रेसिडेन्सी, सेक्टर २०, रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८ | फ्लॅट क्र. १२०४, फिनिक्स नेस्ट सीएचएस लि., प्लॉट क्र. १६, सेक्टर १७, कळंबोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१०२१८ या मालमत्तेचा सर्व भाग किंवा हिस्सा यांचे साम्यिक गहाण. कारपेट क्षेत्रफळः ४२६ चौ. फूट. बँकेला ज्ञात असलेले बोजेः माहिती नाही | रु. ६०,४६,९३९.६१/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. ४८,६०,०००/- २. रु. ४,८६,०००/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. रुपेश कुमार ९०९९००८६९४** |
| ८ | **श्री. प्रशांत अशोक कांबळे** मुक्काम पोस्ट गाढब, तालुका पेण, रायगड-४०२१०७ | फ्लॅट क्र. ए-२०१, २रा मजला, गर्गवरद सीएचएसएल, रामनाथ रोड, अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड-४०२२०१ येथे स्थित मालमत्तेचे साम्यिक गहाण. **बिल्ट अप क्षेत्रफळ: ८०२ चौ. फूट** | रु. ४२,५४,१२०.६३/- दिनांक २८.०८.२०२६ रोजी आणि त्यापुढील इतर आकार | **१६.०९.२०२६ दुपारी ०२:०० ते सायं. ६:००** | **१. रु. १९,०३,५००/- २. रु. १,९०,३५०/- ३. रु. १०,०००/-** | प्रत्यक्ष | **०९.०९.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी २:०० श्री. पियुष राज ७०४५३५६६३५** |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm या वेबसाईट लिंकला आणि https://baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी दूरध्वनी क्र. ०२२-२७८१०६७०, मोबाईल ८२४००७४६५३ वर संपर्क साधू शकतात.

**दिनांक:** २८.०८.२०२६
**ठिकाण:** वाशी, नवी मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा

## PUBLIC NOTICE

Take notice that My Clients, **1)MR. VIJAY G. THAPA 2)MRS. RITA SURENDER GURUNG 3)MRS. RAJANI SUNIL THAPA 4)MR. ANMOL SUNIL THAPA 5)MISS PRECIOUS SUNIL THAPA** have instructed me to invite objection in respect of **FLAT NO.204/A-WING ON THE SECOND FLOOR OF BUILDING NO.87 KNOWN AS SHUBHANGAN-I CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD. situated at BUILDING NO.87/88, POONAM SAGAR COMPLEX, MIRA ROAD(EAST), THANE-401107*(here referred to as the "said flat")***, In Short. **LATE 1)MR. GANESH BAHADUR THAPA 2)MRS. PARMESHWARI THAPA were originally joint owners of the said flat**, whereas, **LATE MR. GANESH BAHADUR THAPA died on 23-06-2006 and left behind only Four Legal Heirs including 1)MRS. PARMESHWARI THAPA(Wife) & 2)MR. SUNIL G. THAPA(Son) 3)MR. VIJAY G. THAPA(Son) 4)MRS. RITA SURENDER GURUNG (Daughter)**, and MRS. PARMESHWARI THAPA had completed all requisite formalities as per the M.C.S.Act, 1960 & Bye-Laws of said Shubhangan-I Co-Operative Housing Society Ltd., and the said society had transfer the Share Certificate of the said flat in the name of **MRS. PARMESHWARI THAPA whereas, LATE MRS. PARMESHWARI THAPA also died on 26-02-2023** and left behind only **Three Legal Heirs** including **1)MR. SUNIL G. THAPA(Son) 2)MR. VIJAY G. THAPA(Son) 3)MRS. RITA SURENDER GURUNG(Daughter)** subsequently, **MR. SUNIL G. THAPA(Son) also died on 07-02-2026** and left behind only **Three Legal Heirs** including **1)MRS. RAJANI SUNIL THAPA(Wife) 2)MR. ANMOL SUNIL THAPA(Son) 3)MISS PRECIOUS SUNIL THAPA (Daughter)**, who all here release, relinquish and surrender all their inheritance rights, title and interest by execute Release Deed in favour of **1)MR. VIJAY G. THAPA(Son) 2)MRS. RITA SURENDER GURUNG(Daughter)** hence; **1)MR. VIJAY G. THAPA(Son) 2)MRS. RITA SURENDER GURUNG (Daughter)** here applied to **Shubhangan-I Co-Operative Housing Society Ltd. situated at Building No.87/88, Poonam Sagar Complex, Mira Road(East), Thane-401107 for the transfer of the said flat in their joint names and the Other Legal Heir including 1)MRS. RAJANI SUNIL THAPA 2)MR. ANMOL SUNIL THAPA 3)MISS PRECIOUS SUNIL THAPA** here consented for the same.

Any person or persons having any objection for grant of membership or having any claim, right, title or interest or any part thereof either by way of inheritances, heirship or mortgage, lease, leave and license, sale or lien, charge, trust, easement, license, tenancy, injunction, possession, exchange, attachment of the Income Tax Authorities or otherwise howsoever are requested to make the same known in writing within **14 Day**s along with the supporting documents to the undersigned at **B-706, Asmita Regency-1, Naya Nagar, Mira Road(East), Thane-401107** within **Fourteen Days (14)** from the date of publication hereof, failing which all such claims and /or objections, if any will be considered as waived and abandoned.

**ADV. RAMSHA KHATIB**
Date:31-08-2026 **(B.L.S L.L.B)**
Place: Mira Road **9821715184**